**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना**

शासन निर्णय, शासन परिपत्रक याबाबत
मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
शासन निर्णय क्रमांक :मग्रारोहयो-२०११/ प्र.क्र.४८/रोहयो-१०
दिनांक : १५ एप्रिल,२०११

संदर्भ :१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५
२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम मार्गदर्शक पुस्तिका २००६
३) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००५/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दि.२३डिसेंबर, २००५
४) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दि. १९ ऑक्टोबर, २००६
५) शा. नि. क्र.मग्रारोहयो-२००७ /प्र.क्र. ५०/ रोहयो-१०, दि.१४ऑगस्ट,२००७
६) शा.नि. नि.वि.क्र.रोहयो-२००७/प्र.क्र.२४/रो-१०, दि. २३ ऑगस्ट,२००७
७) शा.नि.क्र.मग्रारोहयो-२०१०/ प्र.क्र.३०/रोहयो-१०,दि.१५ एप्रिल,२०१०
८) मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/रो-१०, दि.१२ मार्च,२००८
९) शासन परिपत्रक क्र.मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.२/रोहयो १०-अ, दि. १५ ऑक्टोबर,२०१०
१०) शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१०/प्र.क्र. १२/रोहयो-१४, दि.११ नोव्हेंबर,२०१०
११) शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०११/प्र.क्र. १८/रोहयो-१४, दि.१४ मार्च,२०११

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) तीन टप्प्यांमध्ये राज्यात सुरु झाली (दि. २ फेब्रुवारी २००६ मध्ये १२ जिल्हे, सन २००७ मध्ये ६ जिल्हे, दि. १ एप्रिल,२००८ मध्ये १५ जिल्हयांमध्ये) दि. २ फेब्रुवारी २००६ ते १ एप्रिल,२००८ या कालावधीत केंद्र शासनाच्या अधिनियमातील तरतुदींच्या कार्यपध्द्तीनुसार व राज्याच्या महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमांतील तरतुदींच्या कार्यपध्द्तीनुसार राबविण्यात आली.या कालावधीत केंद्रशासनाची योजना व कार्यपध्द्ती नवीन होती. राज्यात एकाच वेळी रोजगार हमी योजना व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना (काही जिल्हयांत) सुरु होती.योजनेच्या अंमलबजावणीकरिता केंद्रशासनाच्या सूचनांनुसार वेळोवेळी शासन निर्णय, शासन परिपत्रकांद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

२. सद्यस्थितीत योजनेच्या अंमलबजावणीकरिताच्या प्रशासकीय मार्गदर्शक सूचना व कार्यपध्द्ती जुन्या रोहयोच्या कार्यपध्द्तीप्रमाणे आहे. त्यामुळे अद्यापही क्षेत्रीय पातळीवर अंमजबजावणी करताना या दोन्ही पध्द्तीबाबत (केंद्र शासनाच्या कायदयानुसार व राज्य रोहयो कायदयानुसार) सरमिसळ केली जात असल्याचे व याबाबत संदिग्धता असल्याचे दिसून येत आहे. मागील पाच वर्षाच्या काळात योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुभवावरुन व केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने विभागाने या आधी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, शासन परिपत्रकांमध्ये मग्रारोहयोच्या सुव्यवस्थित अंमलबजावणीकरिता बदल करणे/अधिक्रमित करणे/दुरुस्त करणे आवश्यक असल्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्यात मग्रारोहयोची अंमलबजावणी करण्याकरिता पूर्वानुभवावरुन या आधीच्या शासन निर्णय, शासन परिपत्रकामध्ये केंद्रशासनाच्या, राज्य शासनाच्या कायदयातील तरतुदींशी व मार्गदर्शक सूचनांशी सुसंगत अनुकुल बदल करण्याच्या दृष्टीने पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना दिल्या जात आहेत.

**<u>१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्य रोहयोमधील कामामधील फरक</u>**

| **मग्रारोहयो (रोजगाराची हमी)** | **रोहयो** |
|---|---|
| - १०० दिवसापर्यंत अकुशल कुटूंबास रोजगाराची हमी<br>- १०० दिवसांपेक्षा अधिक दिवसांकरिता अकुशल व्यक्तीस रोजगाराची हमी | - वैयक्तिक लाभाच्या योजना<br>१) जवाहर विहिरी<br>२) फलोत्पादन<br>३) शेततळी<br>४) तुतीपालन<br>५) खाजगी पडिक जमिन विकास कार्यक्रम |

**१.१) <u>महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना</u>**

केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण अधिनियमांतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना(मग्रारोहयो) राबविली जात आहे. याकरिता १०० दिवसांच्या रोजगाराच्या हमीकरिता केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होतो. १०० दिवसांपेक्षा अधिक रोजगाराकरिता राज्य रोहयो निधीतून खर्च केला जातो. मात्र या अतिरिक्त १०० दिवसांकरिताच्या रोजगाराकरिता मग्रारोहयोची (केंद्र शासनाची) विहित कार्यपध्दती पाळली जाते. मागणीप्रमाणे काम न पुरवल्यास बेरोजगार भत्ता देण्याची तरतुद कायदयात आहे. केंद्र शासनाच्या अधिनियमानुसार मग्रारोहयोची अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,१९७७ मध्ये सन २००६ मध्ये दुरुस्ती केलेली आहे.

**१.२) <u>वैयक्तिक लाभाच्या योजना कार्यक्रम</u>**

१.२(i) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,१९७७ मधील कलम ७(२) (सात) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना महाराष्ट्र शासनाने सुरु केल्या. या योजना अनुदान तत्वावर राज्य शासनाच्या रोहयो निधीतून राबविल्या जातात. या कार्यक्रमांतर्गत दोन महत्वाचे कार्यक्रम घेतले जातात. ते म्हणजे जवाहर विहिरी कार्यक्रम व रोहयोतंर्गत फलोत्पादन कार्यक्रम. त्याचप्रमाणे सामाजिक वनीकरण विभागाकडून खाजगी पडीक जमीन विकास कार्यक्रम राबविला जातो. तुतीपालन कार्यक्रम वस्त्रोद्योग विभागाकडून राबविला जातो. सन २००९-१० पासून शेततळी या कार्यक्रमांतर्गत घेतली जात आहेत. या कार्यक्रमांकरिता जॉबकार्ड दिली जात नाही.

१.२(ii) केंद्र शासनाने दि. ६ मार्च,२००७ व दि.२२ जुलै,२००९ च्या अधिसूचनेद्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमातील शेडयुल I (iv) मध्ये सुधारणा करुन वैयक्तिक लाभाच्या योजनांबाबतची तरतूद विस्तृत केली आहे. त्यानुसार शा.नि.क्र. मग्रारोहयो-२००७/प्र.क्र.५०/रोहयो-१०,अ दि.१४ऑगस्ट,२००७ व शा.नि.क्र.मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.३०/रोहयो-१०, दि.१५एप्रिल,२०१० अन्वये याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार मग्रारोहयोंतर्गत केंद्र शासनाने नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे अनुसूचित जाती/जमाती किंवा दारिद्रय रेषेखाली कुटूंबे किंवा

भुसूधार योजनेचे लाभार्थी किंवा इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी किंवा लघु/सिमांत शेतक-यांच्या जमिनीवर पुढील कामे घेता येतात.

१. सिंचन सुविधा ( विहिरी)   २. फलोत्पादन   ३. भुसूधाराची कामे

मात्र त्याकरिता केंद्र शासनाने विहित करुन दिलेली कार्यपध्द्ती पाळणे आवश्यक आहे. म्हणजेच जॉब कार्ड, मस्टर रोल, MIS data, बँक/पोष्टाचे मजुरीचे वाटप इ. बाबींची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

१.२(iii) याचबरोबर जुन्या रोहयोतील अपूर्ण कामे पूर्ण करण्यावर भर द्यावयाचा आहे. या कामातील अपूर्ण राहिलेला कुशल भाग मार्च,२०१२ पर्यंत पूर्ण करावयाचा आहे.

## २) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मग्रारोहयोमध्ये घेता येऊ शकणारी अनुज्ञेय कामे

२.१. शा.नि. नि.वि.क्र. मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दि. १९ ऑक्टोबर,२००६ मध्ये ८०% कामे जलसंधारणाची घ्यावीत असे नमूद केले आहे. या आधी याबाबत देण्यात आलेल्या सूचना जुन्या रोहयाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या होत्या. मात्र मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/रो-१०, दि.१२ मार्च,२००८ मध्ये नमूद केल्यानुसार जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावयाचे असून ८० : २० (जलसंधारण व रस्ते) ही अट काढून टाकण्यात आली आहे. याबाबत वेळोवेळी शासनपत्रेही देण्यात आली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार कामे घ्यावयाची असून भौगोलिक व स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन कामे घेण्यात यावीत.

२.२ मग्रारोहयोंतर्गत अनुज्ञेय असणा-या कामांची यादी केंद्र शासनाच्या अधिनियमातील शेडयुल I मध्ये दिलेली आहे. सदर यादी www.nrega.nic या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. सुलभ संदर्भासाठी सदर यादी परिशिष्ट 'अ' सोबत जोडली आहे.

२.३ मग्रारोहयोची अंमलबजावणी केंद्रीय निधीतून करण्यात येत आहे. त्यामुळे याबाबत स्पष्ट करण्यात येत आहे की, या यादीनुसार व स्थानिक गरजा लक्षात घेऊन कामे घेण्यात यावीत. केंद्रीय कायदयातील शेडयुल I (२)मध्ये नमूद केल्यानुसार अशा कामांतून चिरस्थायी स्वरुपाची मालमत्ता (durable asset) तयार होणे अत्यंत आवश्यक आहेत. केंद्र शासनाने अनुज्ञेय कामांच्या यादीमध्ये बदल केल्यास नवीन प्रकारची कामे घेता येऊ शकतील. तशी कामे घ्यावयाची असल्यास अभ्यासपूर्ण परिपूर्ण प्रस्ताव केंद्र शासनाकडे पूर्वपरवानगीकरिता पाठवणे आवश्यक आहे.

२.४ केंद्र व राज्य शासन कायदयातील महत्वाची पालन करावयाची बाब म्हणजे योजनेंतर्गत घेण्यात येणा-या कामातून चिरस्थायी स्वरुपाची मालमत्ता (durable asset) तयार होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणजेच सदर मालमत्ता अधिक कालावधीकरिता दृश्य व गुणात्मकदृष्टया टिकाऊ राहिली पाहिजे. या कारणांकरिताच वनराई बंधा-यांची निर्मिती करताना निर्मितीच्या प्रत्येक टप्यावर गावक-यांसह तारिखवार छायाचित्र घेणे बंधनकारक केले आहे.

## ३) कुशल व अकुशल भाग

राज्याच्या जुन्या रोहयोमध्ये प्रत्येक कामाचे अकुशल:कुशल प्रमाण ६०:४० राखणे आवश्यक होते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये (मग्रारोहयो) ६०:४० चे प्रमाण आर्थिक वर्षामध्ये एका तालुक्यातील

सर्व कामांकरिता राखावयाचे आहे. याकरिताच्या सविस्तर सूचना/आदेश शासन परिपत्रक क्र.मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.२/रोहयो १०-अ, दि. १५ ऑक्टोबर,२०१० अन्वये निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**४) <u>उप विभागीय अधिकारी (महसूल) यांची भूमिका</u>**

याआधी शा.नि. नि. वि. क्र. रोहयो-२००७/प्र.क्र.२४/रो-१०, दि. २३ ऑगस्ट,२००७ अन्वये उप विभागीय अधिकारी,महसूल यांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान करण्यात आले होते. मात्र शासन निर्णय,नि.वि.क्र.रोहयो-२००७/ प्र.क्र.२४/रो-१०, दि. ७ फेब्रुवारी,२००८ अन्वये सदर अधिकार रदद् करण्यात आले आहेत. त्यायोगे उप विभागीय अधिकारी, महसूल यांचे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार औपचारिकरित्या जरी काढण्यात आले असले तरी जिल्हाधिकारी त्यांच्या आवश्यकतेनुसार उप विभागीय अधिकारी, महसूल यांची अंमलबजावणीकरिता मदत घेऊ शकतात.

**५) <u>विभागीय आयुक्त कार्यालयाच्या भुमिकेबाबत पुर्नसूचना</u>**

५.१ महाराष्ट्र रोजगार हमी कायदा,१९७७ (सुधारणा २००६) मधील कलम ६(क) (१) व (२) अन्वये विभागीय आयुक्त किंवा याबाबतीत त्यांनी पदनिर्देशित केलेला, सहायक आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी नसणारा कोणताही अधिकारी, योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यास व तिचे पुर्नविलोकन करण्यास सक्षम असतील तसेच योजनेच्या अंमलबजावणीकरिता जिल्हाधिकारी व इतर अधिकारी, इतर संस्था यांचे अधिकारी विभागीय आयुक्तास जबाबदार असतील असे नमूद केले आहे. विभागीय आयुक्तांचे हे अधिकार कायम आहेत. त्यानुसार विभागीय आयुक्त शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करु शकतात. त्यादृष्टीने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ मधील कलम ६(३) मध्ये तरतूद केलेली आहे.

५.२ विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या उपरोक्त प्रदान केलेल्या अधिकारानुसार कार्यवाही करावयाची आहे. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रशासकीयदृष्टया विभागीय आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली काम करावयाचे आहे.

५.३ अतिशय काळजीपूर्वक पुर्नआढावा केल्यानुसार शा.नि.क्र. मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/रो-१०, दि.१९ ऑक्टोबर,२००६ मधील परि. ३ मध्ये नमूद केल्यानुसार विभागीय आयुक्त (महसूल) यांचे 'रोजगार हमी आयुक्त ' हे नामाभिधान आता प्रशासकीय दृष्टया महत्वाचे नसल्याने ते नामाभिधान रद्द करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र. मग्रारो २००६/प्र.१०४/रो.१०, दि. १९ ऑक्टोबर, २००६ च्या शासन निर्णयामध्ये ' जिल्हा कार्यक्रम समन्वयक व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी ग्रामीण रोजगार हमी आयुक्त यांच्या मान्यतेने प्रत्यक्ष वार्षिक खर्चाचा विचार करून निर्णय घ्यावा. ' असे नमूद केले आहे. शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१०/प्र.क्र. १२/रोहयो-१४, दि.११ नोव्हेंबर,२०१० व शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०११/प्र.क्र. १८/रोहयो-१४, दि.१४ मार्च,२०११ अन्वये प्रशासकीय खर्चाच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार मग्रारोहयो व रोहयोच्या अंमलबजावणीबाबतचे सर्व निर्णय जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना घ्यावयाचे आहेत. केंद्र शासनाने जिल्हा हा घटक प्रमाणभूत ठरवून

जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना संपूर्ण योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी सोपविलेली आहे. (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५, कलम १४) जिल्हाधिकारी यांच्या नंतर कार्यक्रम अधिकारी यांच्यावर कायदेशीरदृष्ट्या जबाबदारी सोपविलेली आहे. (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५, कलम १५) यामुळेच या आधीच्या शासन निर्णय, शासन परिपत्रकांमध्ये ज्या ठिकाणी विभागीय आयुक्त यांच्या पूर्वपरवानगीने मान्यता घेण्यांत यावी अशा सूचना दिलेल्या होत्या, त्या आता रद्द करण्यांत येत आहेत. योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी व कार्यक्रम अधिकारी यांनी पार पाडावयाची आहे.

**६) <u>महात्मा गांधी राग्रारोहयोची अंमलबजावणी करताना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जुन्या रोजगार हमी योजनेतील कार्यपद्धती अधिक्रमित करणे</u>.**

६.१. शा.नि.क्र. मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/रो-१०, दि.१९ ऑक्टोबर,२००६ मधील परिच्छेद १९(iv) मध्ये 'मग्रारोहयोची अंमलबजावणी करताना रोहयोमध्ये निर्गमित करण्यांत आलेले आतापर्यंतचे आदेश/ज्ञापने/सारग्रंथ इ. यांच्या सूचनांच्या अनुषंगाने पालन करावे.'; असे नमूद केले आहे. तत्कालीन परिस्थितीमध्ये मग्रारोहयो महाराष्ट्रात नव्याने सुरू झाल्याने वरील प्रकारच्या सूचना देण्यांत आल्या होत्या. त्यामुळे बहुतांश बाबींकरिता व बहुतांश कामांच्या संदर्भात जुन्या रोहयो संदर्भातील सूचनांचे पालन केले जात होते.

६.२. आता सुमारे ५ वर्षानंतर मग्रारोहयो राज्यात सुस्थापित झाल्याने व जुन्या रोहयोप्रमाणे करावयाच्या कामांबाबत/कार्यपद्धतीच्या सूचना केंद्रीय कायद्याशी सुसंगत नसल्याने कालबाह्य ठरल्या आहेत. याकरिता अशा प्रकारच्या केंद्रीय कायद्याशी व राज्याच्या महाराष्ट्र रोजगार हमी कायदा,१९७७ (सुधारणा २००६) शी सुसंगत नसलेल्या सूचना अधिक्रमित करण्यात येत आहेत. केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसृत केल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचना, राज्य कायदा व केंद्रीय कायद्यातील तरतुदी यांचा अभ्यास करून योजनेची अंमलबजावणी करावी. याबाबत आवश्यकता भासल्यास राज्य शासनाकडे मार्गदर्शनाकरिता निर्देश करता येईल.

**७) <u>मग्रारोहयोकरिता अतिरिक्त मनुष्यबळ व जबाबदारीची निश्चिती</u> -**

७.१. महात्मा गांधी राग्रारोहयो अधिनियम २००५ हा इतर राज्यांसाठी नवीन असून महाराष्ट्रामध्ये याआधी महाराष्ट्र रोजगार हमी कायदा अस्तित्वात होता. महाराष्ट्रामध्ये १९७७ पासून रोहयो कायदा अस्तित्वात आला. तेव्हापासून या कायद्यांतर्गत रोहयो राबविण्याकरिता सुमारे १०५९ स्थायी स्वरूपाच्या पदांची निर्मिती विभागीय, जिल्हा व तालुका कार्यालयात करण्यांत आली आहे. सन २००६ पासून मग्रारोहयो सुरू झाल्यानंतर केंद्रशासनाच्या सूचनांप्रमाणे आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात बाहयस्थ पद्धतीने मनुष्यबळ घेण्यास मुभा देण्यांत आली आहे.

७.२. सहायक कार्यक्रम अधिकारी (APO), पालक तांत्रिक अधिकारी यांची सेतू अथवा तत्सम सेवा देणाऱ्या अन्य संस्थांकडून बाह्यस्थः पद्धतीने नेमणूक करावी, अशा पद्धतीच्या सूचना शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१०/प्र.क्र.७/रोहयो १०-अ, दि.१६ डिसेंबर २०१० व दि.५ एप्रिल,२०११ अन्वये देण्यांत आल्या आहेत.

७.३ जिल्हाधिकारी हे मग्रारोहयोचे जिल्हा कार्यक्रम समन्वयक आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त दि. १६ डिसेंबर, २०११ व दि.५ एप्रिल,२०११ च्या शासन परिपत्रकानुसार कामाच्या आवश्यकतेनुसार बाहयस्थ पद्धतीने मनुष्यबळ घेऊ शकतात. असे करताना पुढील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

७.३.(i) जिल्हा/तालुका पातळीवर बाहयस्थ पध्दतीने घेण्यात येणारे मनुष्यबळ सेतूमार्फत अथवा मनुष्यबळ उपलब्ध करुन देणा-या तत्सम एजन्सीकडून घेण्यात यावे. जेणे करुन कोणत्याही कायमस्वरुपी आस्थापनेचा खर्च व कायदेशीर बाबी उद्‌भवणार नाहीत. याबाबतच्या सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. (शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१०/प्र.क्र.७/रोहयो १०-अ, दि.१६ डिसेंबर २०१० व दि.५ एप्रिल,२०११)

७.३.(ii) वरील बाबींकरिता करण्यात येणारा खर्च केंद्र शासनाकडून मिळणा-या ६% प्रशासकीय खर्चातून करावा. शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१०/प्र.क्र. १२/रोहयो-१४, दि.११ नोव्हेंबर,२०१० व शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०११/प्र.क्र. १८/रोहयो-१४, दि.१४ मार्च,२०११ अन्वये प्रशासकीय खर्चाच्या सूचना दिलेल्या आहेत. कोणत्याही स्वरुपाच्या कायमस्वरुपी आस्थापना निर्माण होतील अशा प्रकारची कोणतीही कृती/निर्णय घेण्यात येऊ नयेत. अपवादात्मक परिस्थितीत याबाबत काही निर्णय घ्यावयाचा झाल्यास राज्यशासनाची परवानगी घेणे अनिवार्य राहील. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंअंतर्गत घेण्यात येणा-या कामांवरील खर्च व कंत्राटी पध्द्‌तीवरील मनुष्यबळाच्या मानधनाकरिता करण्यात येणा-या प्रशासकीय खर्चाची सरमिसळ करण्यात येऊ नये. (Work Expenditue and Administrative Expenditure should not br mixed up.)

७.३.(iii) मग्रारोहयोच्या अंमलबजावणीकरीता जरी बाहयस्थ पध्दतीने मनुष्बळ घेतले असले तरी जबाबदारीची कामे कामे शासनाच्या कायमस्वरुपी कर्मचारी/अधिकाऱ्यांच्याकडून करवून घ्यावीत. याकरीता पालक तांत्रिक अधिकाऱ्याची संकल्पना तयार केली आहे. जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी/तहसिलदार/गटविकास अधिकारी व इतर तांत्रिक यंत्रणानी या पध्द्‌तीनुसार काम करावयाचे आहे. थोडक्यात, बाहयस्थ पध्द्‌तीच्या मनुष्यबळाकडून कामे करुन घ्यावीत. मात्र जबाबदारीचे काम कायमस्वरुपी अधिकारी/कर्मचा-याकडून करुन घ्यावे.

७.३.(iv) बाहयस्थ मनुष्यबळाकरिता मानधन वाटपाची पध्द्‌त (याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत) मासिक वेतनावर व कामाच्या Performace वर आधारित असावी. (Assured monthly honorarium + Performance linked incentives)

७.४. दि. १९ ऑक्टो, २००६ च्या शासन निर्णयामध्ये 'सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी/अधिका-यातून कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ घ्यावे' असे नमूद केले आहे. याबाबत क्षेत्रिय पातळीवरील अनुभव असा आहे की, आवश्यक त्या वेळेस अशा प्रकारचे मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. त्यामुळे या शासन निर्णयातील १४.२ (i) हा परिच्छेद वगळण्यात येत आहे. जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नवीन, तरुण व सेवानिवृत्त स्थानिक व्यक्ती अशा दोन्हीपैंकी मनुष्यबळ नेमण्यास मुभा देण्यात येत आहे.

**८) ग्राम रोजगार सेवक**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम,२००५ नुसार ग्रामपंचायतीची प्रथम व महत्वाची कायदेशीर जबाबदारी म्हणजे ग्रामीण भागातील मागेल त्या व्यक्तीस अकुशल रोजगार उपलब्ध करुन देणे. कामाची मागणी करणारे अर्ज, जॉब कार्ड, हजेरीपट इ. या सारखे अभिलेख ग्रामपंचायतीने ठेवणे कायदेशीरदृष्टया आवश्यक आहे. ग्रामपंचायतीचा सचिव या नात्याने ग्रामसेवकास विकास यंत्रणेच्या इतर कामांबरोबर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे कामही करावयाचे आहे. मात्र हे काम करताना ग्रामसेवकास मदत करण्याकरिता ग्रामरोजगार सेवक असून त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**९) प्रशासकीय खर्चाचे व्यवस्थापन**

प्रशासकीय खर्च व कामावरील खर्च याची सरमिसळ केली जाऊ नये. प्रशासकीय खर्चाबाबतच्या सविस्तर सूचना दि.११ नोव्हेंबर,२०१० च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. त्यानुसारच कार्यवाही केली जावी.

**१०) किमान ५०% कामे ग्रामपंचायतीमार्फत घेण्याची तरतुद पाळली जाणे.**

केंद्रीय कायदयाच्या कलम १६(५) मध्ये व राज्य रोहयो अधिनियमातील (सुधारणा २००६) कलम ६-१ (ब) (५) नुसार किमान ५०% खर्चाची कामे ग्रामपंचायतीमार्फत घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(व्ही.गिरीराज)
प्रधान सचिव, रोहयो व जलसंधारण

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
५) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
७)विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे.
८) प्रधान मुख्य वन संरक्षक , महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) आयुक्त, (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी तथा उप विकास आयुक्त (रोहयो).
१३) मुख्य अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) पुणे
१४) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) समिती अधिकारी, कार्यासन ड-७, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१६) सर्व उपसचिव, अवर सचिव, सहायक संचालक(लेखा),कक्ष अधिकारी, सांख्यिकीय अधिकारी (रोहयो प्रभाग)
१७) कक्ष अधिकारी, रोहयो -१, सारसंग्रहाकरिता
१८) निवडनस्ती, रोहयो-१०.
१९) उप संचालक (लेखा) /रोहयो -९ यांना सदर शासन निर्णय वेबसाईटवर अपलोड करण्याकरिता अग्रेषित.

[शासन निर्णय क्रमांक :मग्रारोहयो-२०११/ प्र.क्र.४८/रोहयो-१०, दिनांक : १५ एप्रिल,२०११ ]
(जोडपत्र)

परिशिष्ट 'अ'

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमांतर्गत अनुज्ञेय असलेली कामे**

१. जलसंधारण व जलसंवर्धन कामे
२. दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहीत )
३. जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे)
४. अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती किंवा दारिद्रय रेषेखालील कुटूंबे किंवा भूसुधार योजनेचे लाभार्थी किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थी किंवा लघु किंवा सिमांत शेतक-यांच्या जमिनीवर सिंचन सुविधा, फलोत्पादन व भुसूधाराची कामे.
५. पारंपारिक पाणीसाठयांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे.
६. भूविकासाची कामे.
७. पूरनियंत्रण, पूरसंरक्षकाची कामे, पाणथळ क्षेत्रात चा-याची कामे.
८. ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे.
९. ग्रामपंचायत स्तरावर ग्रामज्ञान संसाधन केंद्र व ग्राम पंचायत भवनाच्या रुपात भारत निर्माण राजीव गांधी सेवा केंद्राची निर्मिती.
१०. केंद्रशासनाशी चर्चा करून राज्यशासनाने ठरविलेली कामे

*********